भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४

**(१९७४ चा अधिनियम क्रमांक ५७)**

[१ जून १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Sick Textile Undertakings (Nationalisation) Act, 1974

**(Act No. 57 of 1974)**

[*As in force on the 1st June 1998*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००७

[**किंमत :** रुपये १७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून, १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि सिल्क टेक्सटाईल अंडरटेकिंग्ज (नॅशनलायझेशन) ॲक्ट, १९७४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक ३, दिनांक १५ ऑक्टोबर, १९९८ यात पृष्ठ २५१ ते २६९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Sick Textile Undertakings (Nationalisation) Act, 1974 as on the 1st June, 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 9, dated 15th October, 1998 on pages 251 to 269.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 15th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४

## कलमांचा क्रम


प्रकरण एक

कलमे

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांच्या अधिकारांचे संपादन**

३. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधातील मालकांच्या अधिकारांचे संपादन

४. निहित होण्याचा सर्वसाधारण परिणाम.

५. विवक्षित पूर्ववर्ती दायित्वांसाठी मालक दायी असणे.

६. राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने दुय्यम निगम बनवणे.

७. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय वस्त्रोद्योग निगमाकडे हस्तांतरित झालेल्या मत्तेच्या मूल्यांसाठी निगमाने भाग विक्रीस काढणे.

प्रकरण तीन

**रक्कम प्रदान करणे**

८. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांना रक्कम प्रदान करणे.

९. आणखी रक्कम प्रदान करणे.

१०. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांनी हिशेब देणे.

प्रकरण चार

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन, इ.**

११. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन, इ.

११क. विवक्षित परिस्थितीमध्ये आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मत्तांची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष उपबंध.

१२. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या व्यवस्थापनाच्या प्रभारी असलेल्या व्यक्तींचे सर्व मत्ता इ. सुपूर्द करण्याचे कर्तव्य.

१३. लेखे.

प्रकरण पाच

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित उपबंध**

१४. विवक्षित कर्मचाऱ्यांची नोकरी चालू ठेवणे.

१५. भविष्यनिर्वाह निधी व इतर निधी.

१६. कर्मचाऱ्यांचे दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरण.

प्रकरण सहा

**प्रदान आयुक्त**

१७. प्रदान आयुक्तांची नियुक्ती.

१८. शासनाकडून आयुक्ताला प्रदान.

१९. राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाच्या विवक्षित शक्ती.

२०. आयुक्ताकडे करण्यात येणारी हक्कमागणी.

२१. हक्कमागणीचा प्राथम्यक्रम.

२२. हक्कमागण्यांची तपासणी.

२३. हक्कमागण्या स्वीकारणे किंवा फेटाळणे.
२४. हक्कमागणीकाराला आयुक्ताकडून रकमेचे संवितरण.
२५. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला रकमेचे संवितरण.
२६. असंवितरित किंवा हक्कमागणी न केलेली रक्कम सर्वसाधारण महसुली लेख्यात जमा करणे.

प्रकरण सात

**संकीर्ण**

२७. दायित्व स्वतःकडे घेणे.
२८. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत व्यवस्थापन परिरक्षकाकडे निहित असणे.
२९. हा अधिनियम अन्य कायद्यांवर अधिभावी असणे.
३०. राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने संविदा अनुसंमत केली नसल्यास ती परिणामक असण्याचे बंद होणे.
३१. विवक्षित प्रकरणांमध्ये मत्ता, इत्यादीचे हस्तांतरण रद्दबातल ठरणे.
३२. शास्ती.
३३. कंपन्याकडून होणारे अपराध.
३४. सद्‌भावपूर्वक करण्यात आलेल्या कृतीस संरक्षण.
३५. न्यायालयाद्वारे वस्त्रनिर्माण कंपनी परिसमापित होणार नाही.
३६. शक्तींचे प्रत्यायोजन.
३७. नियम करण्याची शक्ती.
३८. अडचणी दूर करण्याची शक्ती.
३९. राज्याची धोरणाविषयक घोषणा.
४०. निरसन व व्यावृत्ती.
**पहिली अनुसूची.**
**दुसरी अनुसूची.**

# आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४

**(१९७४ चा अधिनियम क्रमांक ५७)**

(१ जून, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[ २१ डिसेंबर, १९७४ ]

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण यासाठी आणि विविध प्रकारचे कापड व सूत यांचे उत्पादन व रास्त किमतीतील वितरण वाढवून सर्वसामान्य जनतेचे हितसंबंध साधता यावेत यासाठी आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांची पुनर्रचना व पुनर्वसन करण्याकरिता पहिल्या अनुसूचीत विहित केलेल्या अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांचे अधिकार, हक्क व हितसंबंध यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या पंचविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) कलमे ३२ व ३३ चे उपबंध तात्काळ अंमलात येतील आणि या अधिनियमाचे उर्वरित उपबंध १ एप्रिल, १९७४ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येतील.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) " नियत दिनांक " याचा अर्थ, १ एप्रिल १९७४, असा आहे ;

(ख) " बँक " याचा अर्थ,—

(एक) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ (१९५५ चा २३) अन्वये घटित करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक ;

(दोन) भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ३८) मध्ये व्याख्या केलेली दुय्यम बँक ;

(तीन) बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) अन्वये घटित केलेली तत्सम नवीन बँक ;

(चार) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम २ च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे अनुसूचित बँक असलेली कोणतीही इतर बँक, असा आहे ;

(ग) "आयुक्त " याचा अर्थ, कलम १७ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रदान आयुक्त, असा आहे ;

(घ) " अभिरक्षक " याचा अर्थ, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) याच्या कलम ५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अभिरक्षक, असा आहे आणि त्यामध्ये उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) अन्वये वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन हाती घेण्यास केंद्र शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती किंवा व्यक्तींचा निकाय यांचा समावेश होतो ;

(ङ) " राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये, बनवलेले आणि नोंदणी करण्यात आलेले राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, असा आहे ;

(च) " अधिसूचना " याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रकाशित झालेली अधिसूचना, असा आहे ;

(छ) " अध्यादेश " याचा अर्थ, वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अध्यादेश, १९७४ (१९७४ चा १२), असा आहे ;

(ज) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांसंबंधात वापर करताना " मालक " या संज्ञेचा अर्थ, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची, नियत दिनांकाच्या निकटपूर्वी, प्रत्यक्ष स्वामी वा पट्टेदार वा ताबाधारक असलेली अशी कोणतीही व्यक्ती वा पेढी, असा आहे आणि समापित केलेल्या अथवा जिचा व्यवसाय परिसमापकाकडून किंवा प्रापकाकडून चालवण्यात येत असेल अशा वस्त्रनिर्माण कंपनीच्या बाबतीत, त्या परिसमापकाचा किंवा प्रापकाचा त्यात समावेश होतो आणि अशा मालकाचा कोणताही एजंट किंवा व्यवस्थापक यांचाही समावेश होतो, परंतु, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे संपूर्ण किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे व्यवस्थापन हाती घेण्यास, उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) किंवा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या निकायाचा त्यात समावेश होत नाही ;

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ञ) " आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम " याचा अर्थ, पहिल्या अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेला वस्त्रनिर्माण उपक्रम, ज्याचे व्यवस्थापन नियत दिनांकापूर्वी उद्योगधंदे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) अन्वये केंद्र शासनाकडून हाती घेण्यात आले आहे किंवा, प्रकरणपरत्वे, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) अन्वये केंद्र शासनाकडे विहित आहे, असा आहे ;

(ट) " विनिर्दिष्ट दिनांक " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा दिनांक, असा आहे ; आणि या अधिनियमांच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक विनिर्दिष्ट करता येतील ;

(ठ) " दुय्यम वस्त्रनिर्माण निगम " याचा अर्थ, राष्ट्रीय वस्त्रोद्योग निगमाकडून आपली दुय्यम संस्था म्हणून बनवलेला वस्त्रनिर्माण निगम, असा आहे ;

(ड) " वस्त्रनिर्माण " यामध्ये, पूर्णतः वा अंशतः, कापूस, लोकर, ताग, यांच्या किंवा संश्लिष्ट किंवा कृत्रिम (मानव निर्मित) तंतूजापासून बनविण्यात आलेले सूत किंवा कापड यांचा समावेश होतो ;

(ढ) " वस्त्रनिर्माण कंपनी " याचा अर्थ, पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मधील तत्सम नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्त्रनिर्माण उपक्रमाची मालकी असलेली कंपनी, असा आहे ;

(ण) " वस्त्रनिर्माण उपक्रम " याचा अर्थ, वस्त्र निर्माणात गुंतलेला आणि कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) याचे उपबंध ज्याला लागू होतात असा उपक्रम, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु, व्याख्या न केलेले आणि उद्योगधंदे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६१) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

(३) या अधिनियमात किंवा उद्योगधंदे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) यामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले परंतु कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांच्या अधिकारांचे संपादन

आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांसंबंधातील मालकांच्या अधिकारांचे संपादन.

३. (१) नियत दिनांकी, प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम आणि अशा प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांसंबंधातील मालकाचा अधिकार, हक्क व हितसंबंध केंद्र शासनाकडे हस्तांतरित आणि पूर्णपणे निहित झालेला असेल.

(२) पोटकलम (१) च्या आधारे केंद्र शासनामध्ये निहित झालेला प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम, तो अशारीतीने निहित झाल्यानंतर तत्काळ, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित आणि निहित होईल.

निहित होण्याचा सर्वसाधारण परिणाम.

४. (१) कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांत, नियत दिनांकाच्या निकटपूर्वी, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाच्या मालकीत, कब्जात, शक्तीत वा नियंत्रणाखाली असलेली सर्व मत्ता, अधिकार, पट्टेदारी, शक्ती, प्राधिकार व विशेषाधिकार आणि जमिनी, इमारती, कार्यशाळा, भांडारे, उपकरणे, यंत्रावली व साधनसामग्री, रोख शिलकी रकमा, हातातील रोख रकमा, राखीव निधी, गुंतवणुका व पुस्तकी ऋणे यांसह सर्व जंगम व स्थावर संपत्ती आणि अशा संपत्तीमधील वा तीमधून उद्‌भवणारे इतर सर्व अधिकार व हितसंबंध—मग ते भारतातील असोत वा भारताबाहेरील असोत—आणि सर्व लेखापुस्तके, नोंदवह्या व त्यांच्याशी संबंधित कोणत्याही स्वरूपाचे दस्तऐवज यांचा समावेश होत असल्याचे समजण्यात येईल आणि त्यामध्ये कलम ५ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली सर्व दायित्वे व आबंधने यांचाही समावेश होत असल्याचे मानण्यात येईल.

(२) कलम ३, पोटकलम (१) अन्वये केंद्र शासनामध्ये निहित झालेली सर्व पूर्वोक्त संपत्ती, अशा निहित होण्याच्या परिणामी, कोणताही न्यास, आबंधन, गहाण, प्रभार, धारणाधिकार आणि त्यावर परिणाम करणारे इतर सर्व बोजे यांपासून मोकळी व मुक्त करण्यात येईल, आणि अशा संपत्तीचा उपयोग कोणत्याही रीतीने निर्बंधित करणारी कोणत्याही न्यायालयाची जप्ती, व्यादेश, हुकूमनामा वा आदेश मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) एखाद्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधात, मालकाला केंद्र शासन, राज्य शासन वा अन्य कोणतेही प्राधिकरण यांच्याकडून, अध्यादेश प्रख्यापित होण्यापूर्वी कोणत्याही दिनांकी कोणतेही लायसन वा अन्य संलेख देण्यात आलेला असेल अशा बाबतीत असे लायसन किंवा संलेख यात उल्लेखिलेल्या मालकाच्या जागी, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, जणू काही निगमाला असे लायसन वा इतर संलेख देण्यात आले असल्याप्रमाणे अशा

दिनांकी व त्या दिनांकापासून बदली दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि अशा अन्य संलेखान्वये मालकाने ज्या कालावधीसाठी असे लायसन वा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम धारण केला असता त्या उर्वरित कालावधीसाठी, अशा अन्य संलेखात विनिर्दिष्ट करण्यात आलेले असे लायसन वा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम, तो निगम धारण करील.

(४) या अधिनियमान्वये, केंद्र शासनामध्ये निहित असलेल्या कोणत्याही संपत्तीचे प्रत्येक गहाण आणि अशा कोणत्याही संपत्तीमध्ये किंवा त्यासंबंधात कोणताही प्रभार, धारणाधिकार वा अन्य कोणताही हितसंबंध धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि त्या रीतीने, आयुक्ताला, असे गहाण, प्रभार, धारणाधिकार वा अन्य हितसंबंध, यासंबंधात माहिती देईल.

(५) शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही संपत्तीचा गहाणधारक किंवा अशा संपत्तीमधील किंवा संपत्तीसंबंधातील कोणताही प्रभार, धारणाधिकार वा अन्य हितसंबंध धारण करणारी, अन्य कोणतीही व्यक्ती तिचे अधिकार व हितसंबंध यानुसार, अशा संपत्तीसंबंधात पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेमधून, गहाण रक्कम किंवा इतर देय रकमा यांचे पूर्णतः वा अंशतः प्रदान घेण्यास हक्कदार असेल, परंतु केंद्र शासनाकडे निहित झालेल्या कोणत्याही संपत्तीसंबंधात असे कोणतेही गहाण, प्रभार, धारणाधिकार वा अन्य हितसंबंध बजावणीयोग्य असणार नाही.

(६) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधात, कलम (५) च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात, वस्त्रनिर्माण कंपनीकडून वा तिच्या विरुद्ध सुरू केलेला वा दाखल केलेला कोणत्याही स्वरूपाचा, कोणताही दावा, अपील वा अन्य कार्यवाही प्रलंबित असेल तर, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या हस्तांतरणाच्या कारणामुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे तिचे अवसान होणार नाही, तिच्यामध्ये खंड पाडणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे तिच्यावर परिणाम होणार नाही, परंतु दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून किंवा त्याविरुद्ध चालू ठेवता येईल, चालवता येईल व तिची बजावणी करता येईल.

(७) अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला अशा दिनांकी, ज्याचे व्यवस्थापन एखाद्या न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा, आदेश वा व्यादेश यांच्या कारणामुळे वा अन्यथा, केंद्र शासन हाती घेऊ शकले नसेल अशा, कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचा, पूर्णतः वा अंशतः कब्जा जिच्याकडे आहे किंवा तो जिच्या अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा उपक्रम किंवा त्याचा भाग आणि असा उपक्रम किंवा त्याचा हिस्सा यांच्याशी संबंधित सर्व लेखापुस्तके, नोंदवह्या आणि कोणत्याही स्वरुपाचे इतर दस्तऐवज यांचा कब्जा, तात्काळ केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यांच्याकडे अथवा केंद्र शासन, वा प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यासंबंधात विनिर्दिष्ट करील अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करील.

**विवक्षित पूर्ववर्ती दायित्वांसाठी मालक दायी असणे.**

५. (१) नियत दिनांकापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसंबंधातील, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाचे पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दायित्वाव्यतिरिक्तचे प्रत्येक दायित्व हे अशा मालकाचे दायित्व असेल आणि ते त्याच्या विरुद्ध बजावणीयोग्य असेल, केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यांच्या विरुद्ध नव्हे.

(२) (क) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाला, अशा उपक्रमाचे व्यवस्थापन केंद्र शासनाकडून हाती घेण्यात आल्यानंतर, केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा दोहोंकडून देण्यात आलेली कर्जे (त्यावरील देय व्याजासह),

(ख) राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम किंवा राज्य वस्त्रनिर्माण निगम यांच्याकडून किंवा दोहोंकडून आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाला (अशा उपक्रमाचे व्यवस्थापन केंद्र शासनाकडून हाती घेण्यात आल्यानंतर) दिलेल्या रकमा, व त्यावरील देय व्याज,

(ग) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांची अशा उपक्रमाचे व्यवस्थापन केंद्र शासनाकडून हाती घेण्यात आल्यानंतरच्या कोणत्याही कालावधीसंबंधातील मजुरी, वेतन व इतर देय रकमा याबाबतीत उद्‌भवणारे कोणतेही दायित्व,

नियत दिनांकी आणि दिनांकापासून, केंद्र शासनाचे दायित्व असेल आणि अशी कर्जे किंवा रकमा यांची परतफेड देय होताच किंवा असे वेतन किंवा मजुरी किंवा इतर देय रकमा देय व प्रदेय होताच, ते दायित्व त्या शासनासाठी आणि त्याच्यावतीने पार पाडले जाईल.

(३) शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की,—

(क) या कलमात किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही कलमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधातील, नियत दिनांकापूर्वीच्या कोणत्याही कालावधीत बाबतचे, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दायित्वाव्यतिरिक्त अन्य कोणतेही दायित्व, केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यांच्या विरुद्ध बजावणीयोग्य होणार नाही;

(ख) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात, नियत दिनांकापूर्वी उद्‌भवलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात, हक्कमागणीच्या संबंधात किंवा तंट्यासंबंधात एखाद्या, न्यायालयाने, अधिकरणाने किंवा अन्य प्राधिकरणाने कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधात दिलेला/काढलेला कोणताही निवाडा, हुकूमनामा किंवा आदेश, केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यांच्या विरुद्ध बजावणीयोग्य असणार नाही.

(ग) कोणताही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम किंवा त्याचा कोणताही मालक यांच्याकडून, त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या नियत दिनांकापूर्वी झालेल्या व्यतिक्रमणासंबंधाचे दायित्व, केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम यांच्या विरुद्ध बजावणीयोग्य असणार नाही.

**स्पष्टीकरण.**--- या कलमात, "राज्य वस्त्रनिर्माण निगम" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये बनवलेला आणि नोंदणी झालेला, व उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती म्हणून किंवा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) अन्वये अभिरक्षक म्हणून, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असलेला राज्यातील निगम, असा आहे आणि त्यामध्ये, राज्यातील आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांना ज्यांनी कर्जाऊ रकमा दिलेल्या आहेत त्यात पश्चिम बंगाल राज्य वस्त्रनिर्माण निगम मर्यादित, याचा समावेश आहे.

**राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने दुय्यम निगम बनविणे.**

**६.** (१) राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, त्याला तसे करणे आवश्यक वाटले तर, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये दुय्यम निगम बनवील आणि त्या अधिनियमांन्वये त्यांची नोंदणी करील.

(२) राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाला, लेखी आदेशाद्वारे कोणताही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम किंवा त्याचा हिस्सा दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित करता येईल आणि असे कोणतेही हस्तांतरण, उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आल्या असतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन असेल.

(३) दुय्यम वस्त्रनिर्माण निगम, अशा हस्तांतरणाच्या दिनांकी आणि दिनांकापासून, कलम ४ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या लायसनात किंवा अन्य संलेखात, जणू काही असे लायसन किंवा अन्य संलेख, दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाला देण्यात आले असल्याप्रमाणे, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाऐवजी घातले असल्याचे मानण्यात येईल आणि राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने असे लायसन किंवा अन्य संलेख ज्या उर्वरित कालावधीसाठी धारण केला असता त्या कालावधीसाठी त्याला असे लायसन किंवा अन्य संलेख धारण करता येईल.

(४) कोणताही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम किंवा त्याचा कोणताही हिस्सा दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित झाल्यावर कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाद्वारे पार पाडणे आवश्यक असतील अशी दायित्वे, ती अशा रीतीने दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित झालेल्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी किंवा त्याच्या हिश्श्याशी संबंधित असतील तेथवर, अशा हस्तांतरणाच्या दिनांकी आणि दिनांकापासून, त्यांपैकी कोणतेही दायित्व जसजसे पार पाडणे आवश्यक होईल तसतसे दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडून पार पाडण्यात येईल.

(५) या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीज करून, दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित झालेल्या कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या किंवा त्याच्या कोणत्याही हिश्श्याच्या बाबतीतील या अधिनियमातील राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाचे निर्देश हे, दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

**केंद्र शासनाकडून राष्ट्रीय वस्त्रोद्योग निगमाकडे हस्तांतरित झालेल्या मत्तेच्या मूल्यासाठी निगमाने भाग विक्रीस काढणे.**

**७.** (१) कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित झालेल्या आणि त्यामध्ये निहित झालेल्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मत्तेच्या मूल्याइतकी रक्कम, केंद्र शासनाकडून राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाच्या समन्याय भांडवलात केलेले अंशदान असल्याचे मानण्यात येईल; आणि अशा तऱ्हेने केलेल्या अंशदानासाठी राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम (आवश्यक असल्यास त्याच्या ज्ञापनाचे व संस्थापन नियमावलीचे विशोधन केल्यानंतर) अनुसूची एकच्या स्तंभ (४) मधील आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासमोरील संबंधित नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेइतके दर्शनीमूल्य असलेले भरणा झालेले भाग केंद्र शासनाला, त्याच्या समन्याय भांडवलात देईल.

(२) जेव्हा या अधिनियमान्वये केंद्र शासनाने स्वत:कडे घेतलेले कोणतेही दायित्व कलम २७ अन्वये राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून स्वीकारले जाते तेव्हा, केंद्र शासन पोटकलम (१) अन्वये त्यांना देण्यात आलेले व राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून अशा रीतीने स्वीकारण्यात आलेल्या दायित्वांच्या किंमतीएवढे दर्शनीमूल्याइतके असलेले भाग त्या निगमाला परत करील आणि तद्नंतर, अशारीतीने परत केलेल्या भागाच्या दर्शनीमूल्याइतके, त्या राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाचे भाग भांडवल कमी होईल.

## प्रकरण तीन
## रक्कम प्रदान करणे

आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांना रक्कम प्रदान करणे.

८. प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास, असा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम व अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी संबंधित त्या मालकाचे अधिकार, हक्क व हितसंबंध, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये हस्तांतरित करण्यासाठी व ते निहित करण्यासाठी, केंद्र शासन पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मधील त्या उपक्रमाच्या नोंदी समोर विहित केलेल्या रकमेइतकी रक्कम, प्रकरण सहामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने आणि रोखीने देईल.

आणखी रक्कम प्रदान करणे.

९. (१) कलम ३, ४ आणि ५ च्या उपबंधाची पुर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्याच्या प्रतिफलार्थ, ज्याचे व्यवस्थापन केंद्र शासनाने हाती घेतले आहे अशा प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उप-क्रमाच्या मालकाला, केंद्र शासन, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) याच्या कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, नियत दिनांकापासून सुरू होऊन अध्यादेश प्रख्यापित झाला त्या दिनांकास संपणाऱ्या मुदतीकरिता गणना रकमेइतकी रक्कम रोख देईल.

(२) कलम ८ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेशिवाय प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मधील तत्सम नोंदीमध्ये अशा मालकाच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या रकमेवर द. सा. द. शे. ४ टक्के दराने, अध्यादेश प्रख्यापित झाल्याच्या दिनांकापासून सुरू होऊन केंद्र शासनाकडून आयुक्ताकडे अशा रकमेचा भरणा केला जाईल त्या दिनांकी संपणाऱ्या मुदतीकरिता केंद्र शासनाकडून सरळ व्याज रोख देण्यात येईल.

(३) पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेशिवाय आणखी पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने गणना केलेली व्याजाची रक्कम देण्यात येईल.

आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकांनी हिशेब देणे.

१०. (१) जर न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा, आदेश किंवा व्यादेश या अनुसार किंवा अन्यथा, केंद्र शासनास किंवा अभिरक्षकास आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन स्वतःकडे घेण्यास प्रतिबंध होत असेल तर अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचा मालक,—

(क) अध्यादेश प्रख्यापित झाल्याच्या दिनांकापूर्वी, कोणत्याही वेळी, परंतु असा अध्यादेश प्रख्यापित झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, केंद्र शासनाने ज्या उपक्रमाचे व्यवस्थापन हाती घेतले असेल, अशा उपक्रमाच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत, किंवा

(ख) अध्यादेश प्रख्यापित झाल्याच्या दिनांकापूर्वी, परंतु अशा दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, ज्या उपक्रमाचे व्यवस्थापन स्वतःकडे घेणे केंद्र शासनाला शक्य झाले नाही, अशा अन्य कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या बाबतीत,

उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या आदेशाच्या दिनांकाला, किंवा, यथास्थिति, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) याच्या प्रारंभाच्या दिनांकाला सुरू होऊन, केंद्र शासन, किंवा, यथास्थिति, अभिरक्षक, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन स्वतःकडे घेईल त्या दिनांकाला संपणाऱ्या कालावधीच्या संबंधात पुढील बाबींविषयीचे हिशेब देईल :—

(एक) उक्त कालावधीत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संपादित केलेल्या व विकल्या गेलेल्या मत्ता आणि भांडारे ;

(दोन) उक्त कालावधीत विकले गेलेले किंवा पाठविण्यात आलेले कापड ; आणि

(तीन) उक्त कालावधीत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमापासून मालकाने प्राप्त केलेले उत्पन्न.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले हिशेब तपासल्यावर, त्या पोटकलमात निर्दिष्ट केलेल्या अवधीत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमापासून मालकाने कोणतेही उत्पन्न प्राप्त केले आहे, असे आढळून आले तर, असे उत्पन्न केंद्र शासनाला, अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास कलम ८ अन्वये प्रदेय असलेल्या रकमेतून वसूल करता येण्याजोगे असेल आणि या हिशेबात केंद्र शासनाला देय असलेले ऋण हे अप्रतिभूत ऋण म्हणून मानले जाईल.

(३) जर, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाने कोणताही हिशेब दिला नाही, किंवा अशा मालकाने दिलेला हिशेब मूलतः चुकीचा किंवा खोटा आहे, असे मानण्यास केंद्र शासनास कारण असेल तर, केंद्र शासन सदर बाब आयुक्ताकडे सोपवील आणि तद्नंतर आयुक्त, उपक्रमाच्या मालकाने, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमापासून प्राप्त केलेले उत्पन्न निर्धारित करील आणि अशा हिशेबात केंद्र शासनास प्रदेय असलेले ऋण हे जणू काही अप्रतिभूत ऋण असल्याप्रमाणे, उक्त उत्पन्न, कलम ८ अन्वये आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास प्रदेय असलेल्या रकमेतून वसूल करण्यासाठी उपाययोजना करील.

(४) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी किंवा त्याच्या मत्तेशी संबंधित असे कोणतेही गहाण, प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य भार जर, उक्त आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन, केंद्र शासनाने किंवा

अभिरक्षकाने स्वत:कडे घेण्यास, न्यायालयाचा हुकूमनामा, आदेश किंवा व्यादेश किंवा अन्य गोष्टीद्वारे प्रतिबंध केलेल्या मुदतीत निर्माण झालेला असेल तर असे गहाण, प्रभार धारणाधिकार किंवा अन्य प्रभार हा, केंद्र शासनाला किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाला बंधनकारक राहणार नाही.

## प्रकरण चार

## आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन, इ.

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन, इ.**

**११.** राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम किंवा तो निगम लेखी आदेशान्वये विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही व्यक्ती, कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये त्या निगमाकडे ज्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील मालकाचे अधिकार, हक्क आणि हितसंबंध निहित केलेले असतील त्या उपक्रमाचे अधीक्षण, निदेशन, नियंत्रण आणि त्याच्या व्यवहाराचे व कार्याचे व्यवस्थापन करण्याच्या सर्व शक्तींचा वापर करण्यास हक्कदार असेल आणि आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास ज्या गोष्टी करण्यास व (शक्तींचा) वापर करण्यास प्राधिकृत केले असेल त्या सर्व गोष्टी करण्यास व (शक्तींचा) वापर करण्यास प्राधिकृत केले असेल त्या सर्व गोष्टी करील व (शक्ती) वापरील.

**[1][ विवक्षित परिस्थितीमध्ये आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मत्तांची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष उपबंध.**

**११क.** जर राष्ट्रीय वस्त्रोद्योग निगमाला, आजारी वस्त्रोद्योग उपक्रमाचे उत्तम व्यवस्थापन, आधुनिकीकरण पुनर्रचना किंवा पुनरुज्जीवन करणे यासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटत असेल तर, तो निगम, केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेऊन कोणत्याही आजारी वस्त्रोद्योग उपक्रमांची जमीन, संयंत्र, यंत्रसामग्री किंवा अन्य कोणतीही मत्ता हस्तांतरित करील, गहाण ठेवील, विकेल किंवा अन्यथा तिची विल्हेवाट लावू शकेल :

परंतु, असे हस्तांतरण, गहाण, विक्री किंवा विल्हेवाट यांपासून मिळालेले उत्पन्न, ज्यासाठी केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेतलेली नाही, अशा प्रयोजनासाठी उपयोगात आणले जाणार नाही. ]

**आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या व्यवस्थापनाच्या प्रभारी असलेल्या व्यक्तींचे सर्व मत्ता इ. सुपूर्द करण्याचे कर्तव्य.**

**१२.** आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे निहित केल्यावर, ते निहित करण्याच्या लगतपूर्वी, अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या व्यवस्थापनाच्या प्रभारी असलेल्या सर्व व्यक्ती, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील त्यांच्या अभिरक्षेत असलेल्या सर्व मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण उपक्रमाकडे सुपूर्द करण्यास बांधील असतील.

**लेखे.**

**१३.** राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या उपबंधानुसार आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे लेखे ठेवील.

## प्रकरण पाच

## आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित उपबंध

**विवक्षित कर्मचाऱ्यांची नोकरी चालू ठेवणे.**

**१४.** (१) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) यांच्या अर्थानुसार, कामगार असलेली, आणि नियत दिवसाच्या लगतपूर्वी आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचा कर्मचारी म्हणून काम करीत असलेली प्रत्येक व्यक्ती नियत दिवशी व त्या दिवसापासून, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाचा कर्मचारी होईल आणि अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी संबंधित अधिकार जर, राष्ट्रीय निगमाकडे हस्तांतरित केले नसते आणि त्याकडे निहित केले नसते तर, त्या कामगाराला अनुज्ञेय झाले असते असे निवृत्तिवेतन, उपदान व अन्य बाबी या विषयीच्या अधिकारांसह व विशेषाधिकारांसह ती राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमात पद धारण करील, किंवा नोकरी करील आणि तिची राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमात पद धारण करील, किंवा नोकरी करील आणि तिची राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमामधील नोकरी जोवर रीतसर समाप्त होत नाही किंवा जोवर राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून तिचे पारिश्रमिक, सेवेच्या अटी व शर्ती रीतसर बदलल्या जात नाहीत, तोवर ती तसे करणे चालू ठेवील.

(२) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) याच्या अर्थानुसार कामगार नसलेली आणि नियत दिवसाच्या लगतपूर्वी, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण उपक्रमात निहित केलेल्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमात काम करीत असलेली प्रत्येक व्यक्ती नियत दिवसापासून राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाचा कर्मचारी होईल आणि राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमात तो आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम निहित केला नसता तर जे निवृत्तिवेतन, उपदान आणि अन्य बाबींशी संबंधित अधिकार व विशेषाधिकार तिला मिळाले असते, त्या अधिकारांसह व विशेषाधिकारांसह आणि ज्या मुदतीकरिता ती सेवेत राहिली असती, त्याच मुदतीकरिता आणि सेवेचे जे परिश्रमिक तिला मिळाले असते त्याच परिश्रमिकांवर आणि त्याच सेवाशर्तीवर ती, पद धारण करील किंवा नोकरी करील आणि जोवर तिची नोकरी राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून रीतसर समाप्त करण्यात येत नाही किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून तिच्या सेवेचे मिळणारे परिश्रमिक, सेवाशर्ती, यांत जोवर रीतसर बदल करण्यात येत नाहीत तोवर, ती तसे करणे चालू ठेवील :

---

[१] १९९५ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२७ जून १९९५ रोजी व तेव्हापासून).

परंतु, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) अन्वये केंद्र शासनाला ज्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा, आदेश किंवा व्यादेश या कारणामुळे हाती घेता येणार नाही, अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या बाबतीत, त्या उपक्रमाचा कोणताही अभिकर्ता, संचालक (यात, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारा व्यवस्थापकीय किंवा पूर्ण वेळ संचालक यांचा समावेश आहे.) किंवा व्यवस्थापक हा, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण नियमांचा कर्मचारी होणार नाही.

(३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) किंवा त्या काळात अंमलात असलेला अन्य काणेताही कायदा, यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमामध्ये काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सेवेचे राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरण करण्यात आल्याने असा अधिकारी किंवा अन्य कामगार या अधिनियमान्वये किंवा त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणतीही भरपाई मिळण्यास हक्कदार ठरणार नाही आणि अशी भरपाई मिळण्यासाठीचा दावा, कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणात किंवा अन्य प्राधिकरणात विचारात घेतला जाणार नाही.

(४) जेव्हा, सेवा कराराच्या अटींन्वये किंवा अन्यथा ज्या व्यक्तींच्या सेवा या अधिनियमाच्या उपबंधांमुळे समाप्त होतात किंवा त्या सेवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण उपक्रमात हस्तांतरित होतात तेव्हा, ती व्यक्ती निवृत्तिवेतन किंवा उपदान यांच्या रुपाने देण्यात येणाऱ्या रकमेव्यतिरिक्त वेतनाची किंवा मजुरीची थकबाकी मिळण्यास किंवा ज्या कोणत्याही रजेचा फायदा तिने घेतला नसेल, त्या रजेच्या कोणत्याही प्रदानाची किंवा अन्य कोणत्याही प्रदानाची थकबाकी मिळण्यास हक्कदार असेल तर कलम ५ अन्वये केंद्र शासनाने त्या प्रदानाचे असे दायित्व स्वतःकडे ज्या मर्यादेपर्यंत घेतले असेल त्या मर्यादेव्यतिरिक्त, ती व्यक्ती आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाविरुद्ध दावा दाखल करू शकेल, परंतु केंद्र शासनाविरुद्ध किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाविरुद्ध असा दावा दाखल करू शकणार नाही.

**भविष्यनिर्वाह निधी व इतर निधी.**

१५. (१) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या मालकाने अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमात कामाला असलेल्या कामगारांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी, नियत सेवावधी, कल्याणनिधी किंवा अन्य निधी स्थापन केलेला असेल त्याबाबतीत, अशा भविष्यनिर्वाह निधीतील, नियत सेवावधी निधीतील, कल्याणनिधीतील किंवा अन्य निधीतील जमा खाती नियत दिनांकी शिल्लक असलेल्या रकमेपैकी, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये ज्या कामगारांच्या सेवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित केलेल्या असतील अशा कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेली रक्कम, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण उपक्रमाकडे हस्तांतरित करण्यात येईल व ती त्याकडे निहित होईल.

(२) पोटकलम (१) अन्वये राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित केलेल्या पैशांचा व्यवहार निगम, विहित करण्यात येईल अशा रीतीने करील.

**कर्मचाऱ्यांचे दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरण.**

१६. जेव्हा या अधिनियमामध्ये कोणताही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम किंवा त्याचा कोणताही भाग दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाकडे हस्तांतरित केला असेल तेव्हा, कलम १४ ची पोटकलमे (१) व (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रत्येक व्यक्ती, हस्तांतरणाच्या दिनांकाला व तेव्हापासून, दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाची कर्मचारी होईल आणि कलमे १४ व १५ चे उपबंध ज्याप्रमाणे राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाच्या कर्मचाऱ्यांना लागू झाले असते त्याप्रमाणे ते जणू काही उक्त कलमातील निर्देश हे दुय्यम वस्त्रनिर्माण निगमाचे निर्देश असल्याप्रमाणे अशा कर्मचाऱ्याला लागू होतील.

## प्रकरण सहा

## प्रदान आयुक्त

**प्रदान आयुक्तांची नियुक्ती.**

१७. (१) प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला, देय असलेली रक्कम संवितरित करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) त्यास योग्य वाटतील तितक्या व्यक्तींची प्रदान आयुक्त म्हणून नेमणूक करील ; आणि

(ख) ज्या स्थानिक मर्यादांच्या आत प्रदान आयुक्त या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये त्यांच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडतील व त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करतील त्या स्थानिक मर्यादा निश्चित करील.

(२) केंद्र शासन, आयुक्ताला सहाय्य करण्यासाठी त्याला योग्य वाटतील अशा अन्य व्यक्तींची नियुक्ती करील आणि तद्नंतर, त्या आयुक्ताच्या, या अधिनियमान्वये त्याने वापरण्याजोग्या सर्व किंवा कोणत्याही शक्तींचा वापर करण्याकरिता अशा एका किंवा अधिक व्यक्तींना प्राधिकृत करता येईल व वेगवेगळ्या शक्तींचा वापर करण्याकरिता वेगवेगळ्या व्यक्तींना प्राधिकृत करता येईल.

(३) आयुक्ताने कोणत्याही शक्तींचा वापर करण्याकरिता प्राधिकृत केलेली व्यक्ती, त्या शक्तींचा वापर, त्यांना त्या शक्ती प्राधिकारपत्राच्या रूपाने न मिळता जणू काही या अधिनियमान्वये प्रत्यक्ष त्यांनाच प्रदान केल्या असल्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच प्रभावासह करील.

(४) या कलमान्वये नियुक्त केलेला आयुक्त व अन्य व्यक्ती यांचे वेतन व भत्ते यांचा खर्च भारताच्या एकत्रीकृत निधीतून भागविण्यात येईल.

(५) जेव्हा एकापेक्षा अधिक आयुक्तांची नियुक्ती झाली असेल तेव्हा आयुक्तांसंबंधीचे या अधिनियमातील निर्देश हे, पोट-कलम (१) च्या खंड (ख) खाली विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादेतील आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी संबंधित आयुक्ताचे निर्देश आहेत, असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

शासनाकडून आयुक्ताला प्रदान.

१८. (१) केंद्र शासन, आयुक्ताला, विनिर्दिष्ट दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला देण्यासाठी म्हणून पहिल्या अनुसूचीत त्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासमोर विनिर्दिष्ट केलेल्या रकमेइतकी रक्कम रोख देईल आणि कलम ९ ची पोटकलमे (१) व (२) या अन्वये आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास देय असतील अशा रकमाही आयुक्ताला देईल.

(२) उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) अन्वये केंद्र शासनाने ज्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांचे व्यवस्थापन हाती घेतले आहे, त्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या बाबतीत [पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या रकमेशिवाय आणखी] केंद्र शासनाने असे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकाच्या सुरू होऊन नियत दिवशी संपणाऱ्या मुदतीकरिता, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) याच्या कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने गणना केलेली रक्कम आयुक्तास केंद्र शासनाकडून रोख देण्यात येईल.

(३) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७२) अन्वये ज्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन केंद्र शासनाने हाती घेतले आहे अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या बाबतीत [पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या रकमेशिवाय आणखी] केंद्र शासनाने असे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकाच्या सुरू होऊन नियत दिवशी संपणाऱ्या मुदतीच्या संबंधात, या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये देय असलेली परंतु प्रदान करावयाची राहिलेली रक्कम आयुक्तास केंद्र शासनाकडून रोख देण्यात येईल.

(४) केंद्र शासनाकडून भारतीय लोक लेख्यामध्ये आयुक्ताच्या नावे ठेवीचे खाते उघडण्यात येईल व या अधिनियमान्वये आयुक्ताला देण्यात येणारी प्रत्येक रक्कम तो, भारतीय लोक लेख्यातील ठेवींच्या खात्यामध्ये जमा करील व तद्नंतर उक्त ठेवीचे खाते आयुक्ताकडून चालविण्यात येईल.

(५) ज्या उपक्रमाच्या बाबतीत या अधिनियमान्वये आयुक्ताला रक्कम दिलेली आहे त्या प्रत्येक आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे स्वतंत्र अभिलेख आयुक्ताकडून ठेवण्यात येतील.

(६) पोटकलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठेवीच्या खात्यात जमा असलेल्या रकमेवर उपार्जित होणारे व्याज आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाच्या हितासाठी वापरले जाईल.

राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाच्या विवक्षित शक्ती.

१९. (१) इतर सर्व व्यक्तींना वगळून, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमास, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाकडे येणे असलेली व नियत दिवसानंतर वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम, अशी वसूली नियत दिवसापूर्वीच्या कालावधीच्या संबंधात असली तरीही, स्वीकारण्याचा हक्क असेल.

(२) राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमास, नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबतचे आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकीचे कोणतेही दायित्व चुकते करण्याकरिता, अध्यादेश प्रख्यापित झाल्याच्या दिनांकापूर्वी, परंतु, नियत दिवसानंतर, परिरक्षकाने प्रदान केलेल्या प्रत्येक रकमेबाबत, आयुक्ताकडे हक्कमागणी दाखल करता येईल, आणि ज्या प्रकरणाशी संबंधित अशी दायित्वे परिरक्षकाने चुकती केली असतील त्या प्रकरणाला, या अधिनियमाखाली देण्यात आलेल्या अग्रक्रमानुसार, अशा दाखल केलेल्या प्रत्येक हक्कमागणीचा अग्रक्रम असेल.

(३) या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही मुदतीबाबत आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील दायित्वे परिरक्षकाकडून चुकती केली गेलेली नसतील तर ती, त्या आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाची दायित्वे होतील.

आयुक्ताकडे करण्यात येणारी हक्कमागणी.

२०. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाविरुद्ध हक्कमागणी दाखल करणारी प्रत्येक व्यक्ती विहित दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आयुक्तांकडे अशी हक्कमागणी दाखल करू शकेल :

परंतु, जर उक्त तीस दिवसांच्या मुदतीत हक्कमागणी दाखल करण्यास हक्कमागणीकारास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला, याबद्दल आयुक्तांची खात्री पटली तर, पुढील तीस दिवसांच्या मुदतीत तो त्या हक्कमागणीचा विचार करील, परंतु तद्नंतर विचार करणार नाही.

हक्कमागणीचा प्राथम्यक्रम.

२१. दुसऱ्या अनुसूचीत विहित केलेल्या बाबींमुळे निर्माण होणाऱ्या हक्कमागण्यांना पुढील तत्वानुसार प्राथम्यक्रम असतील, उदाहणार्थ—

(क) प्रवर्ग एकचा इतर सर्व श्रेणींच्यावर अग्रक्रम राहील व प्रवर्ग तीनच्यावर प्रवर्ग दोनचा अग्रक्रम असेल आणि याचप्रकारे पुढील अग्रक्रम असतील ;

(ख) प्रवर्ग चार व्यतिरिक्त प्रत्येक प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या हक्कमागणीला सारखाच दर्जा असेल आणि त्या हक्कमागणीची रक्कम पूर्णपणे चुकती करण्यात येईल, परंतु जर अशा हक्कमागणीची पूर्ण रक्कम देण्यासाठी रक्कम अपुरी असेल तर, त्या हक्कमागणीची रक्कम समप्रमाणात कमी करण्यात येईल व त्यानुसार ती चुकती करण्यात येईल ;

(ग) प्रवर्ग चार मध्ये विनिर्दिष्ट केलेली दायित्वे या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमाला अधीन राहून आणि प्रतिभूत कर्जाच्या शर्ती व अशा कर्जाचा परस्परातील प्राथम्यक्रम या अनुसार चुकती केली जातील ; आणि

(घ) उच्च श्रेणीमध्ये विनिर्दिष्ट केलेली सर्व दायित्वे चुकती केल्यानंतर जर रक्कम शिल्लक उरली असेल तरच लगतच्या निम्नश्रेणीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबधातील दायित्वे चुकती करण्याचा प्रश्न निर्माण होईल.

**हक्कमागण्यांची तपासणी.**

२२. (१) कलम २० अन्वये हक्कमागणी करण्यात आल्यावर आयुक्त त्या हक्कमागण्या अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या प्राथम्यक्रमाने लावील व उक्त क्रमानुसार त्यांची तपासणी करील.

(२) हक्कमागण्यांची तपासणी, केल्यानंतर आयुक्ताचे जर असे मत झाले की, या अधिनियमान्वये त्याला दिलेली रक्कम ही, कोणत्याही निम्नश्रेणीत विनिर्दिष्ट केलेली दायित्वे चुकती करण्याकरिता अपुरी आहे, तर त्याने अशी निम्नश्रेणी बाबतची दायित्वे तपासण्याची आवश्यकता राहणार नाही.

**हक्कमागण्या स्वीकारणे किंवा फेटाळणे.**

२३. (१) अनुसूची दोनमध्ये ठरवून दिलेल्या प्राथम्यक्रमाच्या आधारे हक्कमागण्यांची तपासणी केल्यानंतर आयुक्त, विवक्षित दिनांक ठरवील व त्या दिनांकाला किंवा त्या दिनांकापूर्वी प्रत्येक हक्क मागणीकार त्याच्या हक्कमागणीचा पुरावा दाखल करील किंवा आयुक्ताकडून करण्यात येणाऱ्या संवितरणाच्या लाभातून त्याला वगळण्यात येईल.

(२) अशा रीतीने ठरविण्यात आलेल्या दिनांकाची इंग्रजी भाषेतील दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात व आयुक्ताला उचित वाटेल अशा प्रादेशिक भाषेतील दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात जाहिरातीद्वारे कमीत कमी चौदा दिवस आधी नोटीस देण्यात येईल व अशा प्रत्येक नोटिशीत हक्क मागणीकारास त्यांच्या हक्कमागणीचा पुरावा, जाहिरातीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आयुक्तांकडे दाखल करण्यास फर्मावण्यात येईल.

(३) आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, पुरावा दाखल करण्यास कसूर करणाऱ्या प्रत्येक हक्क मागणीकारास आयुक्ताकडून करण्यात येणाऱ्या संवितरणांतून वगळण्यात येईल.

(४) आयुक्ताच्या मते आवश्यक असेल अशा तपासणीनंतर, आणि आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकास हक्कमागणीचे खंडन करण्याची संधी दिल्यानंतर व हक्क मागणीकारास त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आयुक्त, ती हक्कमागणी पूर्णतः किंवा अंशतः लेखी स्वीकारील किंवा नाकारील.

(५) आयुक्ताला, त्यांची कामे पार पाडत असताना निर्माण होणाऱ्या सर्व बाबीसंबंधातील त्यांच्या स्वतःच्या कार्यपद्धतीने विनियमन करण्याची शक्ती असेल, त्यात, जेथे तो त्याची बैठक आयोजित करील, त्या स्थळाचा किंवा स्थळांचा अंतर्भाव होतो, आणि त्याला या अधिनियमाअन्वये, कोणतेही, अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबींच्या संबंधात दाव्याची संपरीक्षा करताना दिवाणी प्रक्रिया संहिता हिच्या अन्वये दिवाणी न्यायालयाकडे विहित असलेल्या शक्ती असतील :—

(क) कोणत्याही साक्षीदाराला उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज किंवा पुरावा म्हणून सादर करता येण्यायोग्य अन्य कोणत्याही महत्त्वाच्या वस्तूचा शोध घेणे व सादर करणे ;

(ग) शपथ पत्रावर पुराव्याचा स्वीकार करणे ;

(घ) साक्षीदाराच्या तपासणीसाठी कोणतेही आयोगपत्र काढणे.

(६) भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १९३ आणि २२८ याच्या अर्थान्वये आयुक्तासमोरील कोणतेही अन्वेषण, न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम १९५ आणि प्रकरण २६ याच्या प्रयोजनार्थ, आयुक्त हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(७) जो हक्क मागणीकार आयुक्ताच्या निर्णयाबाबत असमाधानी असेल तो ; ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत तो आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम स्थित असेल, त्या मूळ अधिकारितेच्या प्रधान दिवाणी न्यायालयाकडे अपील दाखल करील.

परंतु, जेथे उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असलेल्या एखाद्या व्यक्तीची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असेल तेथे असे अपील, ज्या राज्यात आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम स्थित असेल त्या राज्याच्या उच्च न्यायालयाकडे दाखल करण्यात येईल आणि अशा अपिलाची, त्या उच्च न्यायालयाच्या कमीत कमी दोन न्यायाधीशांकडून सुनावणी करण्यात येईल आणि ते निकालात काढण्यात येईल.

**हक्क मागणीकाराला आयुक्ताकडून रकमेचे संवितरण.**

२४. या अधिनियमाखालील एखादी हक्कमागणी स्वीकारल्यानंतर अशा हक्कमागणीच्या संबंधातील देय रक्कम आयुक्ताकडून संबंधित निधीत जमा करण्यात येईल किंवा ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना, अशा रकमा देय असतील त्यांना त्या देण्यास येतील आणि त्या अशा जमा केल्यानंतर किंवा दिल्यानंतर, अशा हक्कमागणी संबंधातील मालकाचे दायित्व चुकते झाल्याचे मानण्यात येईल.

आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला रकमेचे संवितरण

२५. (१) आयुक्ताला, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या संबंधात दिलेल्या पैशातून दुसऱ्या अनुसूचीत विहित करण्यात आलेली दायित्वे चुकती केल्यानंतर काही रक्कम शिल्लक असल्यास, तो अशी शिल्लक रक्कम अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला संवितरित करील.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाला, कोणतेही प्रदान करण्यापूर्वी अशा व्यक्तीचा, ती संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग मिळण्याचा हक्क आहे या विषयी आयुक्त स्वतःची खात्री करून घेईल आणि कलम ८ आणि ९ मध्ये निर्देशिलेली संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग मिळण्याच्या त्या व्यक्तीच्या हक्काविषयी संशय किंवा वाद असल्यास आयुक्त ते प्रकरण न्यायालयाकडे विचारार्थ सोपवील आणि न्यायालयाच्या निर्णयानुसार त्या रकमेचे संवितरण करील.

(३) शंका निवारणार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील नोंदी, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मधील तत्संबंधित नोंदीमधील कोणत्याही विनिर्दिष्ट आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील कोणत्याही व्यक्तीचे अधिकार व हक्क आणि हितसंबंध या विषयाचा निर्णायक पुरावा असल्याचे मानण्यात येणार नाही, आणि अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील कोणत्याही व्यक्तीचे अधिकार, हक्क आणि हितसंबंध सिद्ध करण्याबद्दलचा पुरावा स्वीकार्य असेल.

(४) जेव्हा, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाची कोणतीही यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य संपत्ती राष्ट्रीय वस्त्रोद्योग निहित केली असेल परंतु, अशी यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य संपत्ती अशी आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाच्या मालकीची नसेल तेव्हा, पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये, अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासमोर विनिर्दिष्ट केलेली रक्कम ही, आयुक्ताने, न्यायालयाकडे निर्देश केल्यानंतर न्यायालय, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे मालक व अशी यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य संपत्ती, याचा मालक या दोघांमध्ये, तशी यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य संपत्ती यांचे नियत दिवशी असलेले यथोचित मूल्य लक्षात घेऊन, संविभाजित करील.

**स्पष्टीकरण.—** या कलमात, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांच्या बाबतीत न्यायालय म्हणजे ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमेत वस्त्रनिर्माण उपक्रम आहे, ते मूळ अधिकारितेचे मुख्य दिवाणी न्यायालय.

**असंवितरित किंवा हक्कमागणी न झालेली रक्कम सर्वसाधारण महसुली लेख्यात जमा करणे.**

२६. आयुक्तांकडे भरणा करण्यासाठी आलेली कोणतीही रक्कम, ज्या शेवटच्या दिवशी संवितरण झाले असेल त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत संवितरित न होता शिल्लक राहते किंवा त्या रकमेबद्दल हक्कमागणी होत नाही तेव्हा, आयुक्तांकडून ती रक्कम केंद्र शासनाच्या सर्वसाधारण महसुली लेख्यात हस्तांतरित केली जाईल ; परंतु अशी हस्तांतरित रक्कम मिळण्यासाठी हक्कदार असलेली व्यक्ती केंद्र शासनाकडे अशा रकमेवरील हक्कमागणी दाखल करू शकेल आणि जणू काही तसे हस्तांतरण झालेच नाही असे समजून त्यावर कार्यवाही केली जाईल आणि अशा हक्कमागणीच्या रकमेचा भरणा करण्याबाबतचा कोणताही आदेश असल्यास तो महसुलाच्या परताव्याचा आदेश असल्याचे समजले जाईल.

## प्रकरण सात

## **संकीर्ण**

दायित्व स्वतःकडे घेणे.

२७. (१) दुसऱ्या अनुसूचीच्या प्रवर्ग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीमुळे निर्माण होणारे आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाचे दायित्व जर आयुक्ताने, या अधिनियमान्वये त्यांच्याकडे जमा केलेल्या रकमेतून पूर्णतःचुकते केले नाही तर, तो आयुक्त चुकत्या करावयाच्या राहिलेल्या दायित्वाची व्याप्ती केंद्र शासनाला लेखी कळवील व ते दायित्व केंद्र शासन स्वतःकडे घेईल.

(२) केंद्र शासन, आदेशाद्वारे, पोटकलम (१) अन्वये त्या शासनाने स्वतःकडे घेतलेले कोणतेही दायित्व आपल्याकडे घेण्याचा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमास निदेश येईल व असा निदेश मिळाल्यानंतर असे दायित्व चुकते करणे हे राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाचे कर्तव्य राहील.

पर्यायी व्यवस्था होईपर्यंत व्यवस्थापन परिरक्षकांकडे निहित असणे.

२८. आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे निहित केलेला असला तरीसुद्धा,—

(क) अध्यादेश प्रख्यापित केल्याच्या दिनांकापूर्वी, जो परिरक्षक अशा उपक्रमाची कार्ये पार पाडीत होता तो, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत, जणू काही अशी कार्य पार पाडण्याकरिताच राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने त्यास प्राधिकृत केले आहे; असे समजून ती पार पाडण्याचे चालू ठेवील ; आणि

(ख) परिरक्षक किंवा त्याने या प्रयोजनाकरिता प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून पर्यायी व्यवस्था होईपर्यंत, आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमासंबंधात अशा उपक्रमाचे बँकेतील कोणतेही खाते चालविण्यास, जणू काही असा परिरक्षक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती ही, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून असे खाते चालविण्यास प्राधिकृत केलेली आहे, असे मानून ते खाते चालविणे चालू ठेवील.

हा अधिनियम अन्य कायद्यावर अधिभावी असणे.

२९. अधिनियमाचे उपबंध, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा या अधिनियमाव्यतिरिक्तच्या कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक झालेल्या कोणत्याही संलेखात अथवा कोणत्याही न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात त्या उपबंधाशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असेल तरीही परिणामक होतील.

**३०.** (१) कोणतीही सेवा, विक्री किंवा पुरवठा याकरिता कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या मालकाने किंवा भोगवटादाराने केलेली व नियत दिवसाच्या लगतपूर्वी, अंमलात असलेली प्रत्येक संविदा ही, या अधिनियमास राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्याच्या दिनांकापासून १८० दिवसांच्या कालावधी संपण्यापूर्वी ती संविदा, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडून लेखी अनुसंमत केली नसेल, तर तो कालावधी संपण्याच्या दिवशी व तेव्हापासून परिणामक असल्याचे बंद होईल, व अशी संविदा अनुसंमत करताना यात, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेसह, त्याला उचित वाटतील तसे फेरबदल व आपरिवर्तन त्यांत करील : **राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाने संविदा अनुसंमत केली नसल्यास ती परिणामक असण्याचे बंद होणे.**

परंतु, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम संविदा अनुसंमत करण्याचे वर्जिणार नाही व ती संविदा गैरवाजवीपणे भारयुक्त आहे किंवा वाईट हेतूने केली आहे किंवा ती आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमात अपायकारक आहे, अशी त्याची खात्री पटल्याशिवाय निगम, त्यात कोणतेही फेरबदल किंवा आपरिवर्तन करणार नाही.

(२) राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम, संविदा अनुसंमत करणार नाही व संविदेतील पक्षकरांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्या शिवाय आणि संविदा अनुसंमत न करण्याची किंवा त्यात कोणतेही फेरबदल किंवा आपरिवर्तन करण्याची कारणे लेखी नोंदविल्याशिवाय त्यात कोणतेही फेरबदल किंवा आपरिवर्तन करणार नाही.

**३१.** (१) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (व्यवस्थापन हाती घेणे) अधिनियम, १९७२ याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ज्या कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचे व्यवस्थापन कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा, आदेश किंवा व्यादेश अशा उपक्रमाचा कोणताही मालक, केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) विधेयक, १९७४ लोकसभेत सादर केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून उक्त आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचा भाग असलेल्या कोणत्याही संपत्तीचे किंवा अन्यमत्तेचे विक्रीद्वारे, गहाणाद्वारे, किंवा अन्यथा हस्तांतरण करणार नाही व केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय केलेले असे कोणतेही हस्तांतरण शून्य व अप्रवर्ती ठरेल. **विवक्षित प्रकरणामध्ये मत्ता, इत्यादीचे हस्तांतरण रद्दबातल ठरणे.**

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**शास्ती.**

**३२.** जी व्यक्ती,—

(क) तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असलेली व आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचा एक भाग असलेली संपत्ती, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम किंवा केंद्र शासन यांच्याकडून किंवा याबाबत शासनाने किंवा निगमाने यथास्थिति प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून गैरपणे अडवून ठेवील, किंवा

(ख) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचाच एक भाग असलेल्या कोणत्याही संपत्तीचा गैरपणे कब्जा घेईल किंवा ती ठेवून घेईल किंवा स्वेच्छेने अडवून ठेवील किंवा केंद्र शासन, राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम किंवा त्या शासनाकडून किंवा, यथास्थिति, निगमाकडून विनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडे, तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणात असलेला अशा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमांशी संबंधित दस्तऐवज सादर करण्यास कसूर करील किंवा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाशी संबंधित अशी त्याच्या अभिरक्षेत असलेली कोणतीही मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाच्या किंवा त्या निगमाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करण्यास कसूर करील, किंवा

(ग) कोणत्याही आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाचाच एक भाग असलेली कोणतीही संपत्ती गैरपणे हलवील किंवा नष्ट करील किंवा जी खोटी किंवा पूर्णतः चुकीची आहे, हे तिला माहीत आहे किंवा असे मानण्यास वाजवी कारण आहे, अशी कोणतीही, या अधिनियमाखालील हक्कमागणी दाखल करील, ती व्यक्ती,

दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यादंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

**३३.** (१) एखाद्या कंपनीकडून या अधिनियमान्वये अपराध घडला असेल तर तो अपराध घडला त्यावेळी, कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीचा प्रभार असलेली व कंपनीस जबाबदार असलेली व्यक्ती, तसेच कंपनीही त्या अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा मिळण्यास पात्र असेल ; **कंपन्यांकडून होणारे अपराध.**

परंतु तशा व्यक्तीने जर, हा अपराध आपल्या नकळत करण्यात आला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने यथायोग्य तत्परता दाखविली होती, असे सिद्ध केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा त्या अधिनियमाखालील अपराध हा, कंपनीकडून घडला असेल आणि कंपनीचा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या सहमतीने किंवा मूकानुमतीने किंवा त्यांच्या हयगयीमुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक,

व्यवस्थापक, सचिव, किंवा अन्य अधिकारी अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे व यात पेढीचा व अन्य व्यक्तिसंबधाचा समावेश आहे, आणि

(ख) " संचालक " याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कृतीस संरक्षण.

**३४.** केंद्र शासन किंवा त्या शासनाचा कोणत्याही अधिकारी किंवा परिरक्षक किंवा राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगम किंवा कोणताही दुय्यम वस्त्रनिर्माण निगम किंवा अशा निगमांपैकी कोणीही प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती यांनी या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

न्यायालयाद्वारे वस्त्रनिर्माण कंपनी परिसमापित होणार नाही.

**३५.** आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील अधिकार, हक्क व हितसंबंध ज्या वस्त्रनिर्माण कंपनीच्या मालकीचे असून या अधिनियमान्वये ते राष्ट्रीय वस्त्रनिर्माण निगमाकडे निहित झाले आहेत, ती कंपनी परिसमापित करण्यासाठी किंवा आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या कामकाजाच्या बाबतीत प्रापकाची नियुक्ती करण्यासाठी, केंद्र शासनाचा संमतीशिवाय कोणत्याही न्यायालयात खटला दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही.

शक्तीचे प्रत्यायोजन.

**३६.** (१) केंद्र शासनास, अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमान्वये त्याला वापरता येण्याजोग्या, कलम ३७ खालील शक्तींव्यतिरिक्त इतर सर्व किंवा कोणत्याही शक्तींचा ते अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना वापर करता येईल.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये कोणत्याही शक्तीचे प्रत्यायोजन करण्यात येते तेव्हा, ज्या व्यक्तीस अशी शक्ती प्रत्यायोजित करण्यात येईल ती व्यक्ती, केंद्र शासनाच्या निदेशनाखाली, नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करील.

नियम करण्याची शक्ती.

**३७.** (१) केंद्र शासनास, या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: व पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणेस बाध न आणता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (४) मध्ये निर्देशलेली माहिती ज्या वेळेत व ज्या पद्धतीने देण्यात येईल ती वेळ व ती पद्धत ;

(ख) कलम १५ मध्ये निर्देशिलेला कोणताही भविष्य निर्वाह निधी किंवा अन्य कोणताही निधी यातील पैशाचा व्यवहार ज्या पद्धतीने केला जाईल ती पद्धत ;

(ग) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्र मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तीत स्वरूपात परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याची शक्ती.

**३८.** या अधिनियमाची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र शासनास या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसलेल्या आदेशाद्वारे ती अडचण दूर करता येईल :

परंतु, त्या अधिनियमास राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांची मुदत समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

राज्याची धोरण विषयक घोषणा.

**३९.** याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, संविधानाच्या अनुच्छेद ३९ च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांचे पालन करण्याविषयीचे राज्याचे धोरण अंमलात आणण्याकरिता हा अधिनियम आहे.

**स्पष्टीकरण.—** या कलमात " राज्य " यास, संविधानाच्या अनुच्छेद १२ मध्ये जो अर्थ आहे, तोच अर्थ आहे.

४०. (१) आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अध्यादेश, १९७४ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) असे निरसन झाले असले तरीही, अशा निरसित अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कार्यवाही वा कृती ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केली असल्याचे मानण्यात येईल.

## पहिली अनुसूची

[ कलम २ (ज), ८ व १८ पहा ]

| अनुक्रमांक (१) | उपक्रमाचे नाव (२) | मालकाचे नाव (३) | रक्कम (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| १ | अडोनी कॉटन मिल्स, अलूर रोड, अडोनी (आंध्र प्रदेश). | अडोनी कॉटन मिल्स लिमिटेड, २२, बेल बिल्डिंग, सर पी. एम. रोड, मुंबई-१. | १०,७९,००० |
| २ | अहमदाबाद ज्युपिटर स्पीनिंग, विव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरींग मिल्स, मिल क्रमांक १, दधीची रोड, अहमदाबाद (गुजरात). | अहमदाबाद ज्युपिटर स्पीनिंग, विव्हींग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दधीची रोड, अहमदाबाद. | १,३९,०६,००० |
| ३ | अहमदाबाद ज्युपिटर स्पीनिंग, विव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरींग मिल क्रमांक २, परेल, मुंबई-१३, | | २,३५,६८,००० |
| ४ | अहमदाबाद न्यू टेक्सटाईल्स मिल्स, रायपूर गेट बाहेर, अहमदाबाद, (गुजरात). | दि अहमदाबाद न्यू टेक्सटाईल मिल्स कंपनी लिमिटेड, रायपूर गेट बाहेर, अहमदाबाद. | ९३,४४,००० |
| ५ | अजुधिया टेक्सटाईल मिल्स, आझादपूर, दिल्ली-३३. | दि अजुधिया टेक्सटाईल मिल्स लिमिटेड, २३-२४, राधा बाजार स्ट्रीट, कलकत्ता-१. | ८,४१,००० |
| ६ | अलगप्पा टेक्सटाईल्स (कोचीन) मिल्स, अलगप्पानगर (केरळ). | दि अलगप्पा टेक्सटाईल्स (कोचीन) लिमिटेड, अलगप्पानगर (केरळ). | ४३,६२,००० |
| ७ | अनंतपूर कॉटन मिल्स, ताडपत्री (आंध्र प्रदेश). | दि अनंतपूर कॉटन मिल्स लिमिटेड, ताडपत्री (आंध्र प्रदेश). | २,९७,००० |
| ८ | अपोलो मिल्स, एन. एम. जोशी मार्ग, चिंचपोकळी, मुंबई-११ (महाराष्ट्र). | अपोलो मिल्स लिमिटेड एन. एम. जोशी मार्ग, चिंचपोकळी, मुंबई-११ (महाराष्ट्र). | १,२०,३७,००० |
| ९ | आरती कॉटन मिल्स, दासनगर, हावडा (प. बंगाल). | आरती कॉटन मिल्स लिमिटेड, २९, स्ट्रँड रोड, कलकत्ता-१. | ४,८५,००० |
| १० | असोसिएटेड इंडस्ट्रीज (आसाम) (स्पीनिंग युनिट), चंद्रपूर, जिल्हा कामरुप, (आसाम). | असोसिएटेड इंडस्ट्रीज (आसाम) चंद्रपूर, जिल्हा कामरुप, (आसाम). | १४,१४,००० |
| ११ | औरंगाबाद मिल्स, औरंगाबाद (महाराष्ट्र). | दि औरंगाबाद मिल्स लिमिटेड, १६ हिमगिरी, पदाम टेकडी, पेडर रोड, मुंबई-२६. | १,००० |
| १२ | आझाद जाही मिल्स, वारांगल (आंध्र प्रदेश). | दि आझाद जाही मिल्स लिमिटेड, १५९, गनफौंडरी रोड, हैद्राबाद. | ९२,९५,००० |
| १३ | बालराम वर्मा टेक्सटाईल्स मिल्स शेनकोट्टाह (तामिळनाडू). | बालराम वर्मा टेक्सटाईल्स लिमिटेड, शेनकोट्टाह (तामिळनाडू). | ३४,००,००,०० |
| १४ | बांगश्री कॉटन मिल्स, सोडेपूर (प. बंगाल). | दि बांगश्री कॉटन मिल्स लिमिटेड, चंद्रचूर सदन, सोडेपूर, २४-परगणा, (प. बंगाल). | ४,८५,००० |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| १५ | बेंगाल फाईन, स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, मिल क्र. १, कोन्नागर, जि. हुगळी (प. बंगाल). | बेंगाल फाईन, स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स लिमिटेड, ७, बिपीन बिहारी गांगुली स्ट्रीट, कलकत्ता. | १५,१६,००० |
| १६ | बेंगाल फाईन, स्पीनिंग अँड विव्हींग मिल्स, मिल क्र. २, काटागंज, जि. नाडिया (प. बंगाल). | | ११,९६,००० |
| १७ | बेंगाल लुक्स्मी कॉटन मिल्स, सेरामपूर, जि. हुगली (प. बंगाल). | बेंगाल लुक्स्मी कॉटन मिल्स लिमिटेड, ७, चौरंगी रोड, कलकत्ता. | २२,००,००० |
| १८ | बेंगाल नागपूर कॉटन मिल्स, राजनंदगांव (मध्य प्रदेश). | बेंगाल नागपूर कॉटन मिल्स लिमिटेड ४, लीऑन्स रेंज, कलकत्ता. | ६९,७१,००० |
| १९ | बेंगाल टेक्सटाईल मिल्स, कोसीम बाजार (प. बंगाल). | बेंगाल टेक्सटाईल मिल्स लिमिटेड, मर्कंटाईल बिल्डिंग, लाल बाजार, कलकत्ता. | ३,४८,००० |
| २० | बिहार को-ऑपरेटीव्ह विव्हर्स स्पीनिंग मिल्स, मोकामेह, पाटणा (बिहार). | बिहार को-ऑपरेटीव्ह विव्हर्स स्पीनिंग मिल्स लिमिटेड, मोकामेह, पाटणा. | १३,०७,००० |
| २१ | बिजली कॉटन मिल्स, मेंधू रोड, हाथरस (उत्तर प्रदेश). | दि बिजली कॉटन मिल्स (प्रायव्हेट) लिमिटेड, आग्रा (उत्तर प्रदेश). | २१,४९,००० |
| २२ | बुरहानपूर ताप्ती मिल्स, लालबाग, बुरहानपूर आर. एस. (निमर) (मध्य प्रदेश). | दि बुरहानपूर ताप्ती मिल्स लिमिटेड, बुरहानपूर, आर. एस. (निमर) (मध्य प्रदेश.) | ८६,८०,००० |
| २३ | कंबोडीया मिल्स, ओंडीपूडूर कोईमतुर-१६ (तामिळनाडू). | दि कंबोडीया मिल्स लिमिटेड, ओंडीपूडूर कोईमतुर-१६ (तामिळनाडू). | ६,४४,००० |
| २४ | कॅन्नानोर स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, कॅन्नानोर (केरळ). | दि कॅन्नानोर स्पीनिंग अँड विव्हींग मिल्स, लिमिटेड, कॅन्नानोर (केरळ). | ४७,०८,००० |
| २५ | कॅन्नानोर स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, माहे (पाँडेचरी). | | ६१,२४,००० |
| २६ | सेंट्रल कॉटन मिल्स, हावडा (प. बंगाल) | सेंट्रल कॉटन मिल्स लिमिटेड, ९, बेबॉन रोड, कलकत्ता-१. | ४४,१०,००० |
| २७ | छगनलाल टेक्सटाईल मिल्स, चाळीसगाव, पूर्व खानदेश (महाराष्ट्र). | दि छगनलाल टेक्सटाईल मिल्स, (प्रायव्हेट) लिमिटेड, चौक, भोपाळ (मध्य प्रदेश). | ५,४२,००० |
| २८ | कोईमतुर मुरुगन मिल्स, मेटुपालयम रोड, कोईमतुर-११. | दि कोईमतुर मुरुगन मिल्स लिमिटेड, मेटुपालयम रोड, कोईमतुर-११. | १८,५०,००० |
| २९ | कोईमतुर स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, कृष्णस्वामी मुदलीयार रोड, कोईमतुर-१. | दि कोईमतुर स्पीनिंग अँड विव्हिंग कंपनी लिमिटेड, कृष्णस्वामी मुदलीयार रोड, कोईमतुर-१. | ४७,०३,००० |
| ३० | दयाळबाग स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, अमृतसर, (पंजाब). | सर साहबजी महाराज मिल्स लिमिटेड, दयाळबाग, आग्रा, (उत्तर प्रदेश). | ५,७४,००० |
| ३१ | दिग्विजय स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, लालबाग, परेल, मुंबई-३३, (महाराष्ट्र). | दि दिग्विजय स्पीनिंग अँड विव्हिंग कंपनी लिमिटेड, लालबाग, परेल, मुंबई-३३. | ७५,६५,००० |
| ३२ | एडवर्ड मिल्स, बिवार (राजस्थान) | दि एडवर्ड मिल्स कंपनी लिमिटेड बिवार (राजस्थान). | ६,७९,००० |
| ३३ | एडवर्ड टेक्सटाईल मिल्स, फर्ग्युसन रोड, लोअर परेल, मुंबई (महाराष्ट्र). | एडवर्ड टेक्सटाईल मिल्स लिमिटेड इंदू हाऊस, डोगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई (महाराष्ट्र). | ६६,२८,००० |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| ३४ | फाईन निटिंग मिल्स चामुंडामाता, आसार्वा रोड, अहमदाबाद (गुजरात). | दि फाईन निटिंग कंपनी लिमिटेड, आसार्वा, चामुंडामाता जवळ, अहमदाबाद-१६, (गुजरात). | १०,१७,००० |
| ३५ | गया कॉटन अँड जूट मिल्स, गया (बिहार). | गया कॉटन अँड जूट मिल्स लिमिटेड, गया (बिहार). | १०,४९,००० |
| ३६ | हिमभाई मॅन्युफॅक्चरिंग मिल्स, आऊट साईड सारसपूर गेट, अहमदाबाद (गुजरात). | दि हिमभाई मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, चार्तोडा कब्रस्तान समोर, सारसपूर, अहमदाबाद-१८ (गुजरात). | ५४,७७,००० |
| ३७ | हिरा मिल्स, १/१०, हिरा मिल्स मार्ग (आगार रोड), उज्जैन (मध्य प्रदेश). | दि हिरा मिल्स लिमिटेड, १/१०, हिरा मिल मार्ग (आगार रोड), उज्जैन (मध्य प्रदेश). | १२,३९,००० |
| ३८ | इंडिया युनायटेड मिल्स, मिल क्र. ३१, आंबेडकर मार्ग, मुंबई-१२. | | |
| ३९ | इंडिया युनायटेड मिल्स, मिल क्र. २, भोगले मार्ग, मुंबई-३३. | | |
| ४० | इंडिया युनायटेड मिल्स, मिल क्र. ३, भोगले मार्ग, मुंबई-३३. | दि इंडिया युनायटेड मिल्स लिमिटेड, इंदू हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग (डुगल रोड), बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१. | १,००० |
| ४१ | इंडिया युनायटेड मिल्स, मिल क्र. ४, टि. बी. कदम मार्ग, मुंबई-३३. | | |
| ४२ | इंडिया युनायटेड मिल्स, मिल क्र. ५, चिंचपोकळी लेन, मुंबई-२७. | | |
| ४३ | इंडिया युनायटेड मिल्स, डाय वर्क्स, सावरकर मार्ग, मुंबई-२८. | | |
| ४४ | इंदोर-माळवा युनायटेड मिल्स, इंदोर | दि इंदोर-माळवा युनायटेड मिल्स, लिमिटेड, १३९, मेडोस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. | ९४,२५,००० |
| ४५ | जयशंकर मिल्स बार्शी, बार्शी, जिल्हा सोलापूर (महाराष्ट्र). | दि जयशंकर मिल्स बार्शी लिमिटेड, बार्शी, १३९, जिल्हा सोलापूर (महाराष्ट्र). | ३१,०४,००० |
| ४६ | जहांगिर वकील मिल्स, दिल्ली गेट बाहेर, अहमदाबाद (गुजरात). | दि जहांगिर वकील मिल्स कंपनी लिमिटेड, दिल्ली गेट बाहेर, अहमदाबाद (गुजरात). | ९८,८९,००० |
| ४७ | ज्योती विव्हींग फॅक्टरी, ६९, एस. के. देव रोड, कलकत्ता-४८, (पश्चिम बंगाल). | ज्योती विव्हींग फॅक्टरी (प्रायव्हेट) लिमिटेड, ६९, एस. के. देव रोड, पाटीपुकूर कलकत्ता-४८, (पश्चिम बंगाल). | १,००० |
| ४८ | कालीसवार मिल्स, "ए" युनिट, कोईमतूर (तामिळनाडू). | कालीसवार मिल्स लिमिटेड, कोईमतूर (तामिळनाडू). | ३२,०८,००० |
| ४९ | कालीसवार मिल्स, "बी" युनिट, कल्यानरकोईल (जिल्हा रामनाद), (तामिळनाडू). | | १५,९७,००० |
| ५० | कल्याणमल मिल्स, १५, सिलनाथ कॅम्प, इंदोर (मध्य प्रदेश). | कल्याणमल मिल्स लिमिटेड, १५, सिलनाथ कॅम्प, इंदोर (मध्य प्रदेश). | ९०,६४,००० |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| ५१ | कानोर्ला इंडस्ट्रीज (कॉटन मिल्स सेक्शन), कोनागर (पश्चिम बंगाल). | कानोर्ला इंडस्ट्रीज लिमिटेड, ५९ नेताजी सुभाष रोड, कलकत्ता-१. | ७,८८,००० |
| ५२ | केरळा लक्ष्मी मिल्स, त्रिचूर (केरळ राज्य). | केरळा लक्ष्मी मिल्स लिमिटेड, पुल्लाक्षी, त्रिचूर-४, केरळ राज्य. | २५,७१,००० |
| ५३ | केशव मिल्स, पेटलाड (गुजरात). | केशव मिल्स कंपनी लिमिटेड, पेटलाड (गुजरात). | ५६,२८,००० |
| ५४ | खरार टेक्सटाईल मिल्स, खरार, चंदिगढजवळ. | दि पानीपत वुलन अँड जनरल मिल्स कंपनी लिमिटेड, खरार, चंदिगढजवळ. | १२,८१,००० |
| ५५ | किश्नावेनी टेक्सटाईल्स मिल्स, त्रीची रोड, सिंगनलूर पोस्ट, कोईमतूर (तामिळनाडू). | किश्नावेनी टेक्सटाईल्स लिमिटेड, त्रीची रोड, सिंगनलूर पोस्ट, कोईमतूर-५. | २५,५०,००० |
| ५६ | लक्ष्मी नारायण कॉटन मिल्स, रीश्रा, (पश्चिम बंगाल). | लक्ष्मी नारायण कॉटन मिल्स लिमिटेड, ४-बी, गार्स्टीन प्लेस, कलकत्ता-१. | १८,७७,००० |
| ५७ | लॉर्ड कृष्णा टेक्सटाईल मिल्स, सहारनपूर (उत्तर प्रदेश). | लॉर्ड कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड, चंद हॉटेल, चांदणी चौक, दिल्ली. | ६१,९२,००० |
| ५८ | महालक्ष्मी मिल्स, बेवार (राजस्थान). | दि महालक्ष्मी मिल्स कंपनी लिमिटेड, बेवार (राजस्थान). | ३,६८,००० |
| ५९ | महालक्ष्मी मिल्स वार्टेज रोड, भावनगर (गुजरात). | दि महालक्ष्मी मिल्स लिमिटेड, वार्टेज रोड, भावनगर (गुजरात). | ८३,६१,००० |
| ६० | मेहबूब शाही कुलबर्गा मिल्स, गुलबर्गा (कर्नाटक). | मेहबूब शाही कुलबर्गा मिल्स कंपनी लिमिटेड, गुलबर्गा (कर्नाटक). | १,३४,८४,००० |
| ६१ | मनिंद्र मिल्स, कोसीम बाजार (पश्चिम बंगाल). | मनिंद्र मिल्स लिमिटेड, बी. के. पॉल ॲव्हेन्यू, कलकत्ता. | ७,७१,००० |
| ६२ | मिनर्व्हा मिल्स, माल्लेश्वरम, बंगलोर-३ (कर्नाटक). | मिनर्व्हा मिल्स लिमिटेड, टेंपल बार बिल्डिंग, ७०-फोर्बस स्ट्रीट फोर्ट, मुंबई-१. | ७५,४१,००० |
| ६३ | मॉडेल मिल्स नागपूर, उमरेड रोड, नागपूर (महाराष्ट्र). | दि मॉडेल मिल्स नागपूर लिमिटेड इलँको हाऊस, सर फिरोजशहा मेहता रोड, मुंबई-१. | १,००० |
| ६४ | मुइर मिल्स, सिव्हील लाईन्स, कानपूर (उत्तर प्रदेश). | मुइर मिल्स कंपनी लिमिटेड, सिव्हील लाईन्स, कानपूर (उत्तर प्रदेश). | १,३६,६०,००० |
| ६५ | म्हैसूर स्पीनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग मिल्स, मगादी रोड, बंगलोर (कर्नाटक). | दि म्हैसूर स्पीनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, ७०-फोर्बस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. | ८४,९७,००० |
| ६६ | नटराज स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, निर्मल, अदिलाबाद जिल्हा (आंध्र प्रदेश). | नटराज स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स लिमिटेड, ३७, लाल बहादूर स्टेडीयम, हैदराबाद-१. | १७,२६,००० |
| ६७ | नेथा को-ऑपरेटीव्ह स्पीनिंग मिल्स, ६०८, इलेचीगुडा, सिकंदराबाद-३, (आंध्र प्रदेश). | दि नेथा को ऑपरेटीव्ह स्पीनिंग मिल्स लिमिटेड, सिकंदराबाद-३. | २८,४२,००० |
| ६८ | न्यु भोपाळ टेक्सटाईल मिल्स, चंदबार, तहसील-हुजूर, भोपाळ (मध्य प्रदेश). | दि न्यू भोपाळ टेक्सटाईल्स लिमिटेड, चंदबार, तहसील हुजूर, भोपाळ. | ७,३५,००० |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| ६९ | न्यू कैसर-ई-हिंद स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, घोडपदेव रोड, चिंचपोकळी, मुंबई-३३ (महाराष्ट्र). | न्यू कैसर-ई-हिंद स्पीनिंग अँड विव्हिंग कंपनी लिमिटेड, अशोका अपार्टमेंट, अल्टामाऊंट रोड, मुंबई. | ४८,७०,००० |
| ७० | न्यू माणेकचौक स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, ईदगाह गेटसमोर, अहमदाबाद-१६ (गुजरात). | न्यू माणेकचौक स्पीनिंग अँड विव्हिंग कंपनी लिमिटेड, ईदगाह गेट समोर, अहमदाबाद-१६. | ५४,३७,००० |
| ७१ | न्यू प्रताप स्पीनिंग अँड विव्हींग मॅन्युफॅक्चरिंग मिल्स, धुळे, पश्चिम खानदेश. | न्यू प्रताप स्पीनिंग अँड विव्हिंग मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, धुळे, पश्चिम खानदेश. | ७०,४५,००० |
| ७२ | न्यू व्हिक्टोरिया मिल्स, १४/१, सिव्हील लाईन्स, कानपूर (उत्तर प्रदेश). | न्यू व्हिक्टोरिया मिल्स कंपनी लिमिटेड, १४/१. सिव्हील लाईन्स, कानपूर (उत्तर प्रदेश). | ४७,३८,००० |
| ७३ | ओम परशक्ती मिल्स, कृष्णरायापुरम, गणपथी, पी. ओ., कोईमतूर-६, (तामीळनाडू). | ओम परशक्ती मिल्स लिमिटेड, कृष्णरायापुरम, गणपथी, पी. ओ., कोईमतूर-६. | २७,९९,००० |
| ७४ | ओरिसा कॉटन मिल्स, भगतपूर, कटक. | ओरिसा कॉटन मिल्स, लिमिटेड, ४१, आयर्न साईड रोड, कलकत्ता-१. | १,००० |
| ७५ | उस्मानशाही मिल्स, मिल रोड, नांदेड, (महाराष्ट्र). | उस्मानशाही मिल्स लिमिटेड, मिल रोड, नांदेड (महाराष्ट्र). | १,०६,७१,००० |
| ७६ | पानीपत वुलन मिल्स, खरार, चंदीगढ जवळ. | दि पानिपत वुलन अँड जनरल मिल्स कंपनी लिमिटेड, खरार, चंदीगढजवळ. | ६,४०,००० |
| ७७ | पंकज मिल्स, कोईमतूर. | पंकज मिल्स लिमिटेड, कोईमतूर | २६,१०,००० |
| ७८ | पार्वती मिल्स, क्विलॉन (केरळ). | पार्वती मिल्स लिमिटेड, क्विलॉन (केरळ). | २६,०५,००० |
| ७९ | पायोनियर स्पीनर्स, पायोनियर नगर, (तामीळनाडू). | पायोनियर स्पीनर्स (प्रायव्हेट) लिमिटेड, पायोनियर नगर (तामीळनाडू). | २६,४४,००० |
| ८० | प्रभा मिल्स, विरंगम (गुजरात). | प्रभा मिल्स लिमिटेड, हायवे रोझ बिल्डिंग, ९२, अंबावांडी दीक्षित रोड, विलेपार्ले, मुंबई-५७. | ९,१०,००० |
| ८१ | आर. बी. बन्सीलाल अबीरचंद स्पीनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स, हिंगणघाट (महाराष्ट्र). | आर. बी. बन्सीलाल अबीरचंद स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स कंपनी (प्रायव्हेट) लिमिटेड, हिंगणघाट (महाराष्ट्र). | ५७,५०,००० |
| ८२ | राजकोट स्पीनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स, करणसिंहजी क्रॉस रोड, पोस्ट बॉक्स नं. २, राजकोट (गुजरात). | दि राजकोट स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स लिमिटेड, करनसिंहजी क्रॉस रोड, पोस्ट बॉक्स नं. २, राजकोट. | ३१,७९,००० |
| ८३ | राजनगर स्पीनिंग, विव्हिंग अँड मॅन्यु-फॅक्चरिंग मिल्स, युनिट नं. १, अहमदाबाद (गुजरात). | दि राजनगर स्पीनिंग, विव्हिंग अँड अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, प्रेम गेटबाहेर, अहमदाबाद. | ५८,८१,००० |
| ८४ | राजनगर स्पीनिंग, विव्हिंग अँड मॅन्यु-फॅक्चरिंग मिल्स, युनिट नं. २, अहमदाबाद (गुजरात). | | |
| ८५ | रामपूरीया कॉटन मिल्स, सेरामपूर (पश्चिम बंगाल). | रामपूरीया कॉटन मिल्स लिमिटेड, ८-बी, लाल बाजार, स्ट्रीट, कलकत्ता-१. | ४७,६७,००० |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| ८६ | आर. एस. आर. गोपाळदास मोहता स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, अकोला (महाराष्ट्र). | दि आर. एस. आर. गोपाळदास मोहता स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स (प्रायव्हेट) लिमिटेड, अकोला, जिल्हा अकोला (महाराष्ट्र). | १,०१,८८,००० |
| ८७ | सावतराम रामप्रसाद मिल्स, अकोला (महाराष्ट्र). | सावतराम रामप्रसाद मिल्स कंपनी लिमिटेड, अकोला (महाराष्ट्र). | ५९,३४,००० |
| ८८ | सक्सेरीया कॉटन मिल्स, डिलाईल रोड, परेल, मुंबई. | सक्सेरिया कॉटन मिल्स लिमिटेड, डिलाईल रोड, परेल, मुंबई. | ४९,६७,००० |
| ८९ | श्रीविजय कॉटन मिल्स, विजयनगर (राजस्थान). | श्रीविजय कॉटन मिल्स लिमिटेड, विजयनगर (राजस्थान). | ८७,००० |
| ९० | श्री महालक्ष्मी मिल्स, पालटा (पश्चिम बंगाल). | मेसर्स गजराज पन्नालाल लिमिटेड, कलकत्ता. | २७,२२,००० |
| ९१ | श्री विक्रम कॉटन मिल्स तालकाटोरा, लखनौ (उत्तर प्रदेश). | श्री विक्रम कॉटन मिल्स लिमिटेड, लखनौ (उत्तर प्रदेश). | १२,४६,००० |
| ९२ | सोडेपूर कॉटन मिल्स, सोडेपूर (पश्चिम बंगाल). | सोडेपूर कॉटन मिल्स लिमिटेड, सोडेपूर (पश्चिम बंगाल). | १,००० |
| ९३ | सोमसुंदरम् मिल्स, १०/६४, सोमसुंदरम् मिल्स रोड, कोईमतूर. | सोमसुंदरम् मिल्स (प्रायव्हेट) लिमिटेड, १०/६४, सोमसुंदरम् मिल्स रोड, कोईमतूर (तामिळनाडू). | ३८,२५,००० |
| ९४ | श्री यल्लमा कॉटन, वुलन अँड सिल्क मिल्स, यल्लमानगर, (तोलाहुनासो रेल्वे स्टेशन). | श्री यल्लमा कॉटन, वुलन अँड सिल्क मिल्स कंपनी लिमिटेड, दावणगिरी सीटी (कर्नाटक राज्य). | १०,१८,००० |
| ९५ | श्री भारती मिल्स, मुदलीयार पेठ, पी. ओ. पाँडेचेरी. | श्री भारती मिल्स लिमिटेड, मुदलीयार पेठ, पाँडिचेरी. | १५,२२,००० |
| ९६ | श्री कोथांद्रम स्पीनिंग मिल्स, मदुराई | श्री कोथांद्रम स्पीनिंग मिल्स (प्रायव्हेट) लिमिटेड, मदुराई. | ९७,००० |
| ९७ | श्री रंग विलास गिनींग, स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स, अवानाशी रोड, पीलामेडू पी.ओ. कोईमतूर (तामिळनाडू). | श्री रंग विलास गिनींग, स्पीनिंग अँड विव्हिंग मिल्स लिमिटेड, अवानाशी रोड, पीलामेडू, पी. ओ. कोईमतूर (तामिळनाडू). | ३५,१४,००० |
| ९८ | श्री सारदा मिल्स, पोडनूर (तामिळनाडू). | श्री सारदा मिल्स लिमिटेड, पोडनूर (तामिळनाडू). | ५०,३१,००० |
| ९९ | सूरज टेक्सटाईल मिल्स, मालौट, मंडी, पंजाब. | सूरज टेक्सटाईल मिल्स, मालौट, मंडी, पंजाब. | २,३७,००० |
| १०० | स्वदेशी कॉटन अँड फ्लोअर मिल्स, ७ सीलनाथ कॅम्प, इंदोर-३, (मध्य प्रदेश). | दि स्वदेशी कॉटन अँड फ्लोअर मिल्स लिमिटेड, ७ सीलनाथ कॅम्प, इंदोर-३ (मध्य प्रदेश). | १,००० |
| १०१ | तिरुपती कॉटन मिल्स, रेनीगुंठा, आंध्र प्रदेश. | तिरुपती कॉटन मिल्स लिमिटेड, ८, बोआग रोड, टी. नगर, मद्रास-१७. | २३,९९,००० |
| १०२ | विदर्भ मिल्स (वऱ्हाड) एलिचपूर (महाराष्ट्र). | विदर्भ मिल्स वऱ्हाड लिमिटेड, एलिचपूर (महाराष्ट्र). | ७३,२६,००० |
| १०३ | विजयमोहनी मिल्स, त्रिवेंद्रम. | दि विजयमोहिनी मिल्स लिमिटेड, त्रिवेंद्रम. | ३२,९५,००० |

## दुसरी अनुसूची

(कलमे २१, २२, २३ व २७ पहा.)

आजारी वस्त्रनिर्माण उपक्रमाच्या संबंधातील दायित्वे चुकती करण्याचा प्राथम्यक्रम

### भाग क

### व्यवस्थापन हाती घेतल्यानंतरचा कालावधी

**प्रवर्ग एक ---**

(क्) बँकेने दिलेले अग्रिम.

(ख्) बँकेव्यतिरिक्त अन्य संस्थेने दिलेले अग्रिम.

(ग्) अन्य कोणतेही कर्ज.

(घ्) उदीम किंवा निर्मिती प्रक्रियेच्या प्रयोजनाकरिता घेतलेले अन्य कोणतेही पतकर्ज.

**प्रवर्ग दोन ---**

(क्) केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य विद्युत मंडळ, यांना देय असलेला महसूल, कर, उपकर, पट्टी किंवा अन्य देय रकमा.

(ख्) अन्य कोणत्याही देय रकमा.

### भाग ख

### व्यवस्थापन हाती घेण्यापूर्वीचा कालावधी

**प्रवर्ग तीन ---**

कर्मचाऱ्यांना देय असलेला भविष्यनिर्वाह निधी, वेतन व मजुरी यासंबंधातील थकबाकी व अन्य रकमा.

**प्रवर्ग चार ---**

प्रतिभूत कर्जे.

**प्रवर्ग पाच ---**

केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य विद्युत मंडळ यांना देय असलेला महसूल, कर, उपकर, पट्टी किंवा अन्य देय रकमा.

**प्रवर्ग सहा ---**

(क्) उदीम किंवा निर्मिती प्रयोजनाकरिता घेतलेले कोणतेही पतकर्ज.

(ख्) अन्य कोणत्याही देय रकमा.

## THE SICK TEXTILE UNDERTAKINGS (NATIONALISATION) ACT, 1974

## आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| annulment | शून्यीकरण | [S. 37 (3)] |
| appointed day | नियत दिनांक | [S. 2 (a)] |
| apportioned | संविभाजित | [S. 25 (4)] |
| articles of association | संस्थापन नियमावली | [S. 7 (1)] |
| artificial | कृत्रिम | [S. 2 (e)] |
| authorised | प्राधिकृत | [S. 11] |
| contribution | अंशदान | [S. 7 (1)] |
| custodian | अभिरक्षक | [S. 2 (d)] |
| castody | अभिरक्षा | [S. 4 (7)] |
| delegation | प्रत्यायोजन | [S. 36] |
| direction | निदेशन | [S. 11] |
| disbursement | संवितरण | [S. 23 (1)] |
| equity | समन्याय | [S. 7 (1)] |
| face value | दर्शनीमूल्य | [S. 7 (1)] |
| immediately before the appointed day | नियत दिनांकाच्या निकटपूर्वी | [S. 2 (h)] |
| in consideration of | प्रतिफलार्थ | [S. 9 (1)] |
| injunction | व्यादेश | [S. 4 (2)] |
| instrument | संलेख्यान्वये | [S. 4 (3)] |
| jute | ताग | [S. 2 (e)] |
| lessee | पट्टेदार | [S. 2 (h)] |
| liability | दायित्व | [S. 5 (1)] |
| lien | धारणाधिकार | [S. 4 (4)] |
| liquidator | परिसमापक | [S. 2 (h)] |
| made of fibres | तंतुज | [S. 2 (e)] |
| miscellaneous | संकीर्ण | [Chapter VII title] |
| mortage | गहाण | [S. 4 (v)] |
| obligation | आबंधन | [S. 4 (2)] |
| occupier | ताबाधारक | [S. 2 (h)] |
| override | अधिभावी | [S. 29] |
| priority | प्राथम्यक्रम | [S. 21] |
| promulgated | प्रख्यापित | [S. 4 (3)] |
| refute | खंडन | [S. 23 (4)] |
| rehabilitation | पुनर्वसन | [preamble] |
| removal of daubts | शंका निरसन | [S. 5 (3)] |
| remuneration | परिश्रमिक | [S. 14 (2)] |
| re-organising | पुनर्रचना | [preamble] |

| | | |
|---|---|---|
| secured loans | प्रतिभूत कर्ज | [Schedule II (Part B) (Category IV] |
| shall not abate | अवसान न होणे | [S. 4 (6)] |
| specified date | विनिर्दिष्ट दिनांक | [S. 2 (k)] |
| superintendence | अधीक्षण | [S. 11] |
| synthetic | संश्लिष्ट | [S. 2 (e)] |
| to ratlify | अनुसंमत करणे | [S. 30 (1)] |
| to vest | निहित असणे | [S. 28] |
| trade | उदीम | [Schedule II (part-A] [Category-I) (D)] |
| trust | न्यास | [S. 4 (2)] |
| unsecured | अप्रतिभूत | [S. 10 (2)] |
| yarn | सूत | [S. 2 (e)] |

## आजारी वस्त्रनिर्माण उपक्रम (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७४

## THE SICK TEXTILE UNDERTAKINGS (NATIONALISATION) ACT, 1974

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधीक्षण | superintendence | [कलम ११] |
| अधिभावी | override | [कलम २९] |
| अध्यादेश | ordinance | [कलम २(छ)] |
| अनुसंमत करणे | to ratify | [कलम ३०(१)] |
| अप्रतिभूत | unsecured | [कलम १०(२)] |
| अभिरक्षक | custodian | [कलम २(घ)] |
| अभिरक्षेत | castody | [कलम ४(७)] |
| अवसान न होणे | shall not abate | [कलम ४(घ)] |
| आबंधन | obligation | [कलम ४(२)] |
| अंशदान | contribution | [कलम ७(१)] |
| उदीम | trade | [दुसरी अनुसूची (भाग क) (प्रवर्ग-१) (घ)] |
| कृत्रिम | artificial | [कलम २(ङ्)] |
| खंडन | refute | [कलम २३(४)] |
| गहाण | mortage | [कलम ४(पाच)] |
| ताग | jute | [कलम २(ड)] |
| ताबाधारक | occupier | [कलम २(ज)] |
| तंतुज | made of fibres | [कलम २(ड)] |
| दर्शनीमूल्य | face value | [कलम ७(१)] |
| दायित्व | liability | [कलम ५(१)] |
| धारणाधिकार | lien | [कलम ४(४)] |
| निदेशन | direction | [कलम ११] |
| नियत दिनांक | oppointed day | [कलम २(क)] |
| नियत दिनांकाच्या निकटपूर्वी | immediately before the appointed day | [कलम २(ज)] |
| निहित असणे | to vest | [कलम २८] |
| न्यास | trust | [कलम ४(२)] |
| पट्टेदार | lessee | [कलम २(ज)] |
| परिसमापक | liquidation | [कलम २(ज)] |
| परिश्रमिक | remuneration | [कलम १४(२)] |
| पुनर्रचना | re-organising | |
| पुनर्वसन | rehabilitation | |
| प्रख्यापित | promalgated | [कलम ४(३)] |
| प्रतिफलार्थ | in consideration of | [कलम ९(१)] |
| प्रतिभूत कर्ज | secured loans | [दुसरी अनुसूची (भाग ख) (प्रवर्ग-चार)] |
| प्रत्यायोजन | delegation | [कलम ३६] |
| प्राथम्यक्रम | priority | [कलम २१] |
| प्राधिकृत | authorised | [कलम ११] |

| | | |
|---|---|---|
| विनिर्दिष्ट दिनांक | specified date | [कलम २(ट्)] |
| व्यादेश | injunction | [कलम ४(२)] |
| समन्याय | equity | [कलम ७(१)] |
| सूत | yarn | [कलम २(ड्)] |
| संकीर्ण | miscellaneous | [प्रकरण सात-शीर्षक] |
| संलेख | instrument | [कलम ४(३)] |
| संवितरण | disbursement | [कलम २३(१)] |
| संविभाजित | apportioned | [कलम २५(४)] |
| संस्थापन नियमावली | articles of association | [कलम ७(१)] |
| संश्लिष्ट | synthetic | [कलम २(ड्)] |
| शून्यीकरण | annulment | [कलम ३७(३)] |
| शंकानिरसन | removal of doubts | [कलम ५(३)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई